Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL



# AJANTA





Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Matahi / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi / Hindi | January - March - 2019

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | स्त्रीमुक्ती चळवळीची स्थित्यंतरे व आव्हाने<br>**डॉ. अर्चना काटकर** | ६१-६५ |
| १५ | चाणक्य विचारांचे आधुनिक काळात उपयोजन<br>**प्रा. प्रतिभा धोंडकर** | ६६-६९ |
| १६ | भारतीय संत परंपरेत स्त्रियांचे स्थान<br>**स्वप्निल ठाकरे** | ७०-७३ |
| १७ | भारतीय परंपरेतील श्रीकृष्ण व अर्जुन यांचा स्नेहसंवाद<br>**सुधाकर सानप** | ७४-७८ |
| १८ | मराठवाड्याच्या रंगभूमीवरील अभिजात कलाकृती : वऱ्हाड निघालंय लंडनला<br>**सुनिल सदाशिवराव कांबळे** | ७९-८३ |
| १९ | आधुनिक मराठी साहित्य : एक चिंतन<br>**डॉ. प्रशांत गुणवंतराव चौधरी** | ८४-८८ |
| २० | जागतिकीकरण व बहुसंस्कृतीवाद - राष्ट्रराज्यासमोरील आव्हान<br>**अश्विनी भास्करराव शिंदे** | ८९-९२ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# १९. आधुनिक मराठी साहित्य : एक चिंतन

**डॉ. प्रशांत गुणवंतराव चौधरी**
व्यंकटेश महाजन महाविद्यालय उस्मानाबाद.

'भाषा' हा सर्वप्रकारच्या मानवी आविष्कारांचा मूलभूत असा प्रेरणास्त्रोत असतो. जगातील जेत्यांचा आणि पराजितांचा इतिहास पाहिल्यास त्यात 'भाषा' हे अत्यंत प्रभावी असे शस्त्र बनलेले दिसून येते. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही 'भाषे'चे महत्व तसूभरही कमी झालेले नाही. येथे भाषा हा शब्द 'स्वभाषा' या अर्थाने वापरला आहे. किंबहुना स्वभाषेबद्दलचा आग्रह अधिक जोरकस बनलेला दिसतो.

पारतंत्र्यात लोकमान्य टिळकांनी जी चतु:सूत्री सांगीतली तीत 'स्वभाषा' हे एक सूत्र होते. जिचा संबंध सांस्कृतिक अस्मितेशी निगडीत होता. आजही भाषिक अस्मिता आहेच; पण अस्मितेपेक्षाही मुद्दा अधिक चर्चिला जात आहे तो अस्तित्वाचा! 1990च्या दशकात सूरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जी सांस्कृतिक मोडतोड सूरू झाली, तीत प्रादेशिक भाषा उध्वस्त होतील, अशी भिती वर्तविली जात होती. आज पाऊण शतकानंतरच्या कालक्रमणानंतर काय आढळते? भाषा उध्वस्त होण्यापेक्षा अवस्थांतरीत होत असलेल्या दिसतात. जागतिक स्तरावर स्वीकारल्या गेलेल्या (असे मानले जाते हा एक भोंगळ दावा असू शकतो!) इंग्रजी भाषेचे आक्रमण जगातील–विशेषतः विकसनशील समुहातील राष्ट्रांच्या भाषांवर होऊन या भाषांचा भाषिक अवकाश संकुचित झालेला दिसतो, हे वास्तव नाकारता येत नाही. तथापि, वास्तव अपरीवर्तनीय असते, असे समजायचे काय कारण? त्यातही मराठीसारख्या समृध्द वारसा असणाऱ्या भाषा व संस्कृतीला तर हे वास्तव लागू पडते की नाही, हा अभ्यासाचा विषय आहे.

मागील 60–65 वर्षात मराठी भाषेत निर्माण झालेल्या साहित्याकडे दृष्टिक्षेप टाकल्यास आणि विद्यमान वाङमयाचा विचार केल्यास असे ठामपणे म्हणता येऊ शकेल की, मराठी भाषा संक्रमणाच्या या काळातून ताऊन सुलाखून निघाली आहे. वाङमयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने आधुनिक मराठी साहित्याचे जे कालखंड मानले जातात त्यात 1945 पासून नवसाहित्याचा काळ मानला जातो. 26 जानेवारी 1950 ला आपण राज्यघटनेचा स्वीकार केला. कैक शतकांच्या कालक्रमणानंतर उगवलेला हा दिवस भारतीयांच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा दिवस आहे. त्यानंतरच्या 50 वर्षात मराठी साहित्यात भरीव असे सर्वस्पर्शी लेखन झालेले दिसते. हा कालखंड ऐतिहासिक दृष्टीने अपूर्व असा आहे. कारण तो आपल्या देशाच्या राजकीय स्वातंत्र्याचा व स्वतंत्र आधुनिक भारताच्या संविधानाधिष्ठित पुनर्रचनेचा प्रारंभकाल आहे. सांस्कृतिक दृष्टीने हे अर्धशतक नव्या अस्मिता, नव्या आशा, नव्या मुक्तीच्या कल्पना यांबरोबरच बहुस्तरीय समस्या, संघर्ष, चळवळी व आंदोलने तसेच क्रमशः होत गेलेला मूल्यऱ्हास व विघटन यांनी आंदोलित राहणारे आहे. संविधानाधिष्टित सर्वंकश सांस्कृतिक जडणघडणीच्या आरंभबिंदूपासून प्रस्थान ठेवणारे हे अर्धशतक जागतिकीकरणाच्या जटील पर्वापर्यंत येवून ठेपले आहे आणि आज त्यात नवनविन ताणतणावांची भर पडत आहे.. त्याचे हे द्विध्रुवात्मक स्वरूप ओळखणे व उलगडून दाखवणे सोपे नाही. मराठी वाङमयाच्या दृष्टीने हा कालखंड नवता; बहुविधता व निर्मितीक्षमता यांच्या दृष्टीने बहराचा कालखंड आहे.

या अर्धशतकीय कालखंडातील मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी पाहताना प्रथम या कालखंडाच्या निकटच्या काळात जावे लागते. 1939 ते 1945 या दरम्यान झालेल्या दुसऱ्या जागतिक युध्दाने अनेक प्रश्न उपस्थित केले हे युध्द या शतकातील एक अत्यंत भयावह अशी घटना होती. या युध्दात जवळ जवळ सात कोटी लोक ठार झाले. एक कोटी वीस लक्ष ज्यू नागरिक केवळ नाझी छळ छावण्यांत ठार झाले. जीवितहानीप्रमाणेच वित्तहानीही मोठ्या प्रमाणात झाली. हिरोशिमा आणि नागासाकी येथील बॉम्ब वर्षावांनी पुढल्या अनेक पिढ्या उध्वस्त झाल्या. वा. रा.कांत (नागासाकीचे अंध), बा.सी.मर्ढेकर आदिंच्या अनेक कवितांमधून महायुध्दाच्या विनाशाने मानवतेसमोर उभ्या केलेल्या संकटांची चर्चा झाली आहे. याच काळात भारतासमोर उभे राहिलेले गंभीर राष्ट्रीय संकट फाळणीचे होते. ०3 जून 1947 रोजी फाळणीचा निर्णय झाला. या निर्णयानंतर सुरू झालेल्या धार्मिक दंगली हे आधुनिक भारताच्या राजकीय वाटचालीतील एक काळेकुट्ट पर्व आहे. हजारोंच्या संख्येने झालेल्या अमानुश कत्तली आणि धर्मांध उन्माद यांचे प्रतिध्वनी तत्कालीन काव्यात उमटलेले दिसतात. 'काहीं कविता'मध्ये मर्ढेकर या हत्याकांडावर प्रतिकया देताना म्हणतात,

''काहो माजविता दुही, भरावतां स्वातंत्र्याची वही
स्वजन रक्ताने प्रत्ययही लळथळां ''

तथापि, या पेक्षा अधिक खोलवर चिंतन आणि तदानुषंगिक प्रतिकिया मराठी साहित्यात उमटलेली दिसत नाही. फाळणीच्या रक्तरंजित पार्श्वभूमीवर आलेले स्वातंत्र्य, या नंतरच्या साडेपाच महिन्यात (30जानेवारी 1948 रोजी झालेली महात्मा गांधींची हत्या) घडलेल्या घटना भारतीय जनमानस ढवळून काढत होत्या. व्यंकटेश माडगुळकरांच्या 'वावटळ' या कादंबरीत गांधी हत्येनंतर महाराष्ट्रात उद्भवलेल्या परिस्थितीचे मनोज्ञ चित्रण करण्यात आले आहे.

वरील घटनाकमाच्या काहीं वर्षे आगोदर (1941) प्रसिध्द झालेला बा.सि. मर्ढेकर यांचा 'वाङमयीन महात्मता' हा दीर्घ निबंध ही या कालखंडातील एक महत्वपूर्ण वाङमयीन घटना होय. तत्कालीन मराठी वाङमय हे केवळ इंग्रजी वाङमयावर पुष्ट झालेले असून त्यात स्वतःचे असे काही नाही, अशा आशयाची टीका मर्ढेकरांनी या निबंधात केली आहे. तसेच साहित्य समीक्षेबद्दल नवविचारही व्यक्त केले आहेत, ज्याचा परिणाम पुढीलांच्या टीकादृष्टीवर झालेला दिसतो. 1945 पासून मराठी नवसाहित्याचा कालखंड सुरू झाला असे मानले जाते. दुसरे महायुध्द, जातीय दंगे, हत्या यातून मानवी जीवनाची दिसून आलेली क्षणभंगूरता, मानवाची असहाय्यता, त्याचे एकाकीपण, ईश्वराच्या उपस्थितिविषयी उत्पन्न झालेली शंका या सारखे अनुभव नवसाहित्यातून व्यक्त होऊ लागले. 'नवी मळवाट' (1949) या पहिल्याच कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत शरच्चंद्र मुक्तिबोध म्हणतात ''देशातील विराट विपन्नतेमुळे एक प्रकारची सर्वभक्षी निराशा व विफलता साऱ्या भारतास ग्रासू पाहत आहे. मध्यम वर्ग विफलतेच्या या भावनेने खचून गेला आहे.'' सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील अस्थैर्याचे चित्रण मुक्तिबोध त्यांच्या काव्यात करतात व मा... केंद्रीत व्यवस्थेच्या नवमूल्यांची आवश्यकता प्रतिपादित करतात.

कवितेप्रमाणेच कथेच्या प्रांगणातही नवतेचा उदय याच काळात झाला. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा.भावे व व्यंकटेश माडगूळकर हे नवकथेचे प्रवर्तक मानले जातात. गाडगीळांनी त्यांच्या 'खडक आणि पाणी' या लेखसंग्रहातून नवसाहित्याचे जोरकस समर्थन केले आहे. या काळातील नवी दृष्टी असणारे टीकाकार म्हणजे दि. के. बेडेकर हे होत. नवसाहित्याचे स्वागत करताना त्यांनी घेतलेले आक्षेपही महत्वाचे आहेत. बेडेकर आणि गाडगीळ

यांच्यात निर्माण झालेला वैचारिक वाद या काळातील वाङमयीन चर्चेला दिशा देऊन गेला. बेडेकरांनी मार्क्सवादी दृष्टीकोनातून मर्ढेकर आणि गाडगीळ यांच्या लेखनावर आक्षेप घेतले तर, त्यांच्या 'नवकाव्याची विफलता' या लेखाचा प्रतिवाद करणारा 'नवकाव्याची सफलता'(सत्यकथा ऑक्टो. 1950) हा लेख लिहून गाडगीळांनी नवसाहित्याचे जोरदार समर्थन केले.

दि. के. बेडेकर आणि गंगाधर गाडगीळ यांच्यातील चर्चा साहित्यतत्वविचाराच्या दृष्टीने महत्वाची आहे. मुख्यतः मर्ढेकरांच्या कवितेने कवितेच्या अभिव्यक्तिविषयी, अभिव्यक्तिच्या दुर्बोधतेविषयी, आशयाविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. नकारात्मक रितीने मर्ढेकरांनी साम्राज्यवादी–भांडवलवादी सत्तेचे आणि तिच्या वर्चस्वाखाली असलेल्या समाजाचे भेदक चित्रण केले आहे.

26जानेवारी1950 रोजी भारताची राज्यघटना अंमलात आली. घटनेच्या प्रास्ताविकातील मूल्यविचार कविंना, लेखकांना, कलावंतांना प्रेरणा देणारा आहे. 1960 नंतर उदयाला आलेल्या विभिन्न वाङमयीन प्रवाहांवर घटनेच्या सरनाम्यातील मूल्यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. जून 1956 मध्ये केंद्र सरकाने महाराष्ट्र व गुजरात ही स्वतंत्र राज्ये आणि मुंबई हे केंद्रशासीत राज्य करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची उग्र प्रतिकीया महाराष्ट्रात उमटली. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाखाली आंदोलन उभे राहिले अंतिमतः मे 1960 मध्ये मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिती झाली, मात्र त्यासाठी 108 हुतात्म्यांना आपले बलिदान द्यावे लागले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनेही मराठी साहित्य विश्व ढवळून निघाले.

1960 चे दशक विविध आंदोलनांनी गजबजलेले दशक होते. सहकारी चळवळ, शेतकरी चळवळ, दलित चळवळ, भटक्या–विमुक्तांचे लढे, स्त्री मुक्ती चळवळ, विविध वाङमयीन चळवळी आदींनी महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रात एक घुसळण निर्माण केली. मौलिक अशा कलाकृतींची निर्मितीही याच काळात होत होती. 'धग'(1960) या कादंबरीत उध्दव शेळके यांनी दारिद्र्य आणि अज्ञान यांच्या विरूध्द चालेला झगडा समर्थपणे उभा केला. याच वर्षात आलेली भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी मध्यमवर्गीय सामान्य माणसाच्या मनोविश्वाचे भेदक चित्रण करणारी तसेच मूल्यऱ्हासाचे दर्शन घडवणारी कादंबरी होय. 'इंधन' (1864) मध्ये हमीद दलवाई यांनी अल्पसंख्य समाजाच्या मनातील तगमग तन्मयतेने चित्रित केली. शंकर पाटलांच्या 'टारफुला'मध्ये (1964) खेड्यातील संघर्ष आहे. 'गोतावळा'मध्ये (1964) आनंद यादवांनी बदलते ग्रामजीवन व बदलती मूल्ये यांचे चित्रण केले आहे. रा.रं.बोराडे यांच्या 'पाचोळा' (1971) या कादंबरीत स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची सत्ताकांक्षा आणि त्यात पराभूत होणारी सामान्य माणसे यांचा विफल संघर्ष चित्रित केला आहे. 1972 आणि 73 मध्ये विजय तेंडूलकरांच्या 'सखाराम बाईंडर' आणि 'घाशीराम कोतवाल' या नाटकांनी साहित्यकृती आणि संस्कृती, अश्लिलता, साहित्य, राजकारण, यांच्या सहसंबंधातील प्रश्न उपस्थित केले. भाऊ पाध्ये यांच्या 'वासूनाका'ने (1966) मराठी वाचकांच्या अभिरूचीविषयी आणि लेखकाच्या वास्तव चित्रणाविषयी गंभीर प्रश्न उपस्थित केले.

1960 च्या दशकातील एक महत्वाची चळवळ, दलित साहित्याची चळवळ होय. 1958 साली मुबईत भरलेल्या दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात अण्णाभाऊ साठे यांनी दलितांचे साहित्य संमेलन कशासाठी, या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. ''आजच्या मराठी साहित्यात दलितांच्या जीवनाचे प्रतिबिंब आढळत नाही''. असे स्पष्टीकरण आण्णाभाऊंनी दिले, ते वास्तविक असेच होते. दलित साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, कार्य

आणि लेखन हिच आहे. 1968 मध्ये सुरू झालेल्या 'अस्मितादर्श' या नियतकालिकाच्या माध्यमातून दलित साहित्यिक लिहिते झालेले दिसतात.

या अर्धशतकातील आणखीन एका घटनेचा साहित्यासह एकुणच समाजजीवनावर खोलवर परिणाम झाला. 26 जून 1975 रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदीरा गांधी यांनी देशावर आणीबाणी लादली. घटनेने प्रदान केलेल्या सर्व प्रकारच्या मानवी हक्कांवर प्रतिबध घालत अनिर्बंध रितीने लादल्या गेलेल्या या आणीबाणीने देशासमोर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले. कऱ्हाड येथे 1975 मध्ये भरलेल्या साहित्यसंमेलनात अध्यक्षा दुर्गाबाई भागवत यांनी लेखनस्वातंत्र्याचा पुरस्कार केला व जाहीररित्या लोकनायक जयप्रकाश नारायण यांचे अभिष्टचिंतन केले. याच संमेलनात मंगेश पाडगांवकर यांनी 'भिंत' ही आणीबाणी विरोधी आशय असणारी कविता सादर केली. नंतरच्या काळात आणीबाणीच्या अनुषंगाने व्यापक लेखन मराठीत होत राहिले. 6 डिसेंबर 1992 मध्ये अयोध्या येथील वादग्रस्त वास्तू पाडल्याने निर्माण झालेला जातीय संघर्ष, मार्च 1993 मध्ये मुंबईत झालेले बॉबस्फोट यांनी समाजमन हादरून गेले त्याच प्रमाणे साहित्यजगतातही या घटनांचे प्रतीध्वनी उमटले.

1980 नंतरच्या काळात अनेकविध नवसाहित्यप्रवाहांनी मराठी साहित्यात प्रवेश केलेला दिसतो. नोव्हेंबर 1989 मध्ये पहिले आदिवासी साहित्य संमेलन भरले व त्या नंतर आदिवासी साहित्य ही संकल्पना अस्तित्वात आली. आदीवासींचे मौखिक साहित्य विपूल आहे. तथापि, त्यांचे जीवन, त्यांची संस्कृती, त्यांचा इतिहास, वर्तमानकाळातील त्यांचा संघर्ष याचे म्हणावे तसे चित्रण मराठी साहित्यात झाले नाही.

स्त्रीवादी चळवळ आणि तिच्या प्रेरणेतून निर्माण झालेले साहित्य हे या कालखंडातील एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. संयुक्त राष्ट्रांनी 1975 ते 1985 हे स्त्रीयांचे दशक म्हणून जाहीर केले. त्याचा भक्कम आधार महाराष्ट्रतील स्त्रीचळवळीला मिळाला. 1975 मध्ये पुण्यात पहिली स्त्रीमुक्ती चळवळ भरली. येथून पुढील काळात विविध संमेलने, आंदोलने यांनी स्त्रीजगत गजबजत राहिले. सिमॉन द बोवा यांच्या 'द सेकंड सेक्स' या पुस्तकाचा शांता किर्लोस्कर यांनी केलेला 'बायकांचा जन्म' हा अनुवाद 1975 मध्ये प्रकाशीत झाला. या पुस्तकाच्या प्रेरणेतून विपूल असे वाङमय स्त्री लेखिकांनी निर्माण केले.

1985 नंतरच्या मराठी साहित्य विचारावर नेमाडेप्रणित देशीवादाचा प्रभाव होता. 'टीकास्वयंवर' (1990) या ग्रंथातील काही प्रकरणांमधून नेमाडे यांनी देशीवादाच्या स्वरूपावर प्रकाश टाकला आहे. त्या त्या भूमीशी जोडलेले असणे, या अर्थाने 'देशी' ही संज्ञा नेमाडे यांनी वापरलेली आहे. या संज्ञेच्या अनुषंगाने मराठी विचारवंतांमध्ये झालेली चर्चा उद्बोधक अशी आहे.

1990 नंतरचा चर्चेचा केंद्रबिंदू जागतिकीकरणाकडे वळलेला दिसतो. ही संज्ञा भिन्न भिन्न आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रवाहांना सामावून घेणारी संज्ञा आहे. आर्थिक उदारमतवाद, मुक्त बाजार, पाश्चिमात्यीकरण किंवा अमेरिकिकरण, इंटरनेट क्रांती, जागतिक एकात्मता हे प्रतिशब्द वेगवेगळया संदर्भात जागतिकीकरणास उद्देशून वापरलेले दिसतात. तंत्रज्ञानातील वेगवान बदलांमुळे जगाचे एकच वैश्विक खेडे बनले आहे, ही जागतिकीकरणातील एक धारणा आहे.

भारतासारख्या कृषिप्रधान देशावर या आर्थिक जागतिकीकरणाचा किती गंभीर परीणाम झाला आहे, याची चर्चा संदर्भाने विपूलतेने झालेली असली तरी मराठी वाङमयाच्या क्षेत्रात या गंभीर परिणामाचे प्रतिध्वनी प्रभावी रित्या

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]